व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई व राष्ट्रीय कौशल्य प्रशिक्षण संस्थेंतर्गत होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाकरीता प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक आयटीआय-२०२६/प्र.क्र. ५५/व्यशि-३,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : २४ एप्रिल, २०२६**

**संदर्भ :**

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. टिआरएन-२०२३/प्र.क्र.६६/२३/१२-अ, दि. २७.०९.२०२३

२) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र: का. क्र. -७/ सीटीएस/ २०२६/NSTI MOU/२६६, दि. २२.४.२०२६

**प्रस्तावना :**

राज्य शासन सेवेत सर्व स्तरावर कार्यक्षमता वाढवून गतिमान प्रशासन होण्याकरीता राज्यातील कर्मचारीवृंद यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. आर्थिक, सामाजिक व तांत्रिक बदलांमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांना सामोरे जाणे व प्रशासनामध्ये बदलासाठी आवश्यक असणारी लवचिकता साध्य करणे यासाठी सर्व स्तरावर प्रशिक्षण देणे गरजेचे आहे.

संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये राज्य प्रशिक्षण धोरण-२०११ नुसार यशदा, पुणे (शिखर संस्था) तसेच विभागीय व जिल्हा स्तरावर घोषित करण्यात आलेल्या प्रशिक्षण संस्थांचे निवासी प्रशिक्षण शुल्काचे दर सुधारित करण्यात आले आहेत.

संदर्भ क्र. २ अन्वये औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील तसेच संचालनालयाअंतर्गत अधिकारी, कर्मचारी व निदेशक इत्यादी कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाबाबत संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई आणि राष्ट्रीय कौशल्य प्रशिक्षण संस्था,मुंबई (NSTI) यांच्यादरम्यान करार करण्याचे प्रस्तावित आहे. त्याअनुषंगाने सदर प्रशिक्षणाचे विहित केलेल्या प्रशिक्षण दरास व प्रशिक्षणाच्या करारास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये कार्यरत असलेल्या तसेच संचालनालयाअंतर्गत अधिकारी, कर्मचारी व निदेशक इत्यादी कर्मचाऱ्यांना बदलत्या औद्योगिक गरजांनुसार तांत्रिक आणि अध्यापन कौशल्ये (Pedagogy) अद्ययावत करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय कौशल्य प्रशिक्षण संस्था,मुंबई (NSTI) ही केंद्र सरकारच्या डीजीटी (DGT) अंतर्गत असलेली एक अग्रगण्य संस्था असून, त्यांच्याकडे प्रगत प्रयोगशाळा, वसतिगृह आणि तज्ञ प्रशिक्षक उपलब्ध आहेत. त्यानुषंगाने संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनाय, मुंबई आणि राष्ट्रीय कौशल्य प्रशिक्षण संस्था,मुंबई यांच्यादरम्यान सामंजस्य करार करण्यात येणार आहे. सदर करार एप्रिल २०२६ पासून

पुढील ३ वर्षांच्या कालावधीसाठी वैध राहील. त्याअनुषंगाने सदर प्रशिक्षणाचे पुढीलप्रमाणे प्रस्तावित केलेल्या प्रशिक्षण दरास व प्रशिक्षणाच्या करारास मान्यता देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | प्रशिक्षण कालावधी | खर्च (नोंदणी प्रक्रिया शुल्क, शिकवणी शुल्क, जिमखाना, वसतिगृह, प्रशिक्षक साहित्य, जेवनाचा खर्च) | एकूण खर्च | प्रति दिन खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | ३ आठवडे १९दिवस | १००+६०००+१५+१९००+३०००+७१२५ | १८१४० | ९५४.७५ |
| २ | २ आठवडे १२ दिवस | १००+४०००+१५+१२००+३०००+४५०० | १२८१५ | १०६७.९१ |
| ३ | १ आठवडे ६ दिवस | १००+२०००+१५+६००+३०००+२२०० | ७९१५ | १३१९.१६ |

२. उपरोक्त खर्चास शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थामधील तसेच संचालनालयाअंतर्गत अधिकारी, कर्मचारी व निदेशक इत्यादी कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी येणाऱ्या खर्चास वित्त विभागाच्या दिनांक १७.४.२०१५ मधील वित्तिय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उप विभाग-चार, खर्चाच्या संकिर्ण बाबी संबंधी प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार यामधील अ.क्र.१० अन्वये भारतातील प्रशिक्षण फी वरील खर्च मंजूर करण्यास प्रदान केलेल्या वित्तीय अधिकारान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

३. याअंतर्गत उपरोक्त प्रस्तावित केलेल्या दराने सदरहू संस्थेमध्ये (उपलब्ध कालावधीनुसार) सन २०२६-२७ या वर्षामध्ये प्रशिक्षणासाठी उपलब्ध असलेल्या प्रशिक्षणावरील खर्च दक्ष योजनेतून लेखाशिर्ष (२२३०ए८४४/राज्य हिस्सा) व (२२३०ए८५३/जागतिक बँक केंद्र हिस्सा) मध्ये तसेच शिल्प निदेशकांच्या प्रशिक्षणासाठी लेखाशिर्ष (२२३०ए१९२) व (२२०३३४७१) मध्ये उपलब्ध होणाऱ्या मंजूर व वितरीत अनुदानातून करण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४२४१८१३१८९५०३ असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

BHAROSE
MUNJA UMARAO

Digitally signed by BHAROSE MUNJA UMARAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SEEID, 2.5.4.20=F3ABF3AB8B16DFEC487F18CE64D6B0AB8E38D8925D44D15F7DBD61BABB4AE6DF, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8B015B0D7AFAA0DB7C0603C5C954E6816492DBB5F94AB286DA7F224853A4EEBF, cn=BHAROSE MUNJA UMARAO
Date: 2026.04.24 18:14:10 +05'30'

**( मुं.उ. भरोसे )**

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई

२. विशेष कार्य अधिकारी, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई
३. कक्ष अधिकारी, व्यशि-१, कौशल्य , रोजगार, उदयोजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई
४. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय मुंबई/पुणे/नाशिक/ छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर,
६. सह/उप संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, संचालनालय,मुंबई
७. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय (संचालनालयामार्फत)
८. निवड नस्ती, व्यशि-३